# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. सआ/आर/द./      /अति. व निर्मू. दि.12.03.2020

**जाहीर सुचना**

बृहन्मुंबईमधील रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा आणणारी वाहने तेथून हटविण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 मधील कलम 312व 313सह 314 मधील तरतुदीनुसार केले जाते.अशा प्रकारे दिनांक 01.01.2018 पासून दिनांक 4.06.2018 पर्यन्त ताब्यात घेतलेली वाहने सहा.आयुक्त,आर-दक्षिण विभाग दूसरा मजला सा.व.प तरण तलाव जवळ महात्मा गांधी क्रॉस रस्ता क्र 2 कांदिवली (प) मुंबई -400067 येथे दिनांक 21.03.2020पर्यन्त आपला हक्क शाबीत करुन नियत आकार भरून वाहन मालकांनी न सोडविल्यास सदर वाहन/ वाहने मनपा अधिनियम 1888 मधील कलम 490 (3) मधील तरतुदीनुसार दिनांक.23.03.2020 रोजी सकाळी 11:30 वाजता अशा प्रकारची वाहने लिलावात काढण्यात येतील.

अशा प्रकारे ताब्यात घेतलेल्या वाहनापैकी बरीच वाहने क्रमांक विरहित असून रस्त्यावर असेच सोडून दिलेली असल्याचे आढळली आहेत. ही वाहने चोरीच्या प्रकरणात गुंतली असण्याची शक्यता आहे. काही वाहनाची नोंदणी महाराष्ट्राबाहेर झालेली आहे .त्याच प्रमाणे राष्ट्रीयकृत बँका व सहकारी बँका यांनी कदाचित अर्थ सहाय्य दिलेले असेल आणि वाहन त्याच्या नावे तारण ठेवलेली असेल.तसेच गाडी चोरीस गेली असे समजून विमा कंपन्यांनी कदाचित देयक रक्कम चुकती केली असेल.

तरी अश्या प्रकारच्या सर्व वाहनाच्या मालकांना आणि इतर संबधित व्यक्ती बँक आणि विमा कंपन्याना सहा.आयुक्त,आर-दक्षिण विभाग यांचे विभाग कार्यालय, सहाय्यक अभियंता (परीरक्षण) आर-दक्षिण विभाग ,दूसरा मजला सा.व.प तरण तलाव जवळ महात्मा गांधी क्रॉस रस्ता क्र 2 कांदिवली (प) मुंबई -400067 येथे शनिवार ,रविवार सुट्टीच्या दिवसखेरीज इतर कामाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 पर्यन्त या सदर्भात इतर माहिती करिता संपर्क साधावा ते इच्छुक असल्यास वाहनाची यादी तपासू शकतील.

तसेच,लिलाव सदर्भात इच्छुक ठेकेदार यांनी खाली दिलेल्या तक्त्यानुसार संपर्क साधावा.

- निरीक्षण दिनांक : 16.03.2020ते 18.03.2020. सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 पर्यन्त
- इसारा ठेव रक्कम जमा करणे दिनांक :19.03.2020ते 20.03.2020
- लिलाव दिनांक :23.03.2020रोजी सकाळी 11.30 वाजता.

इतर माहिती व अटी शर्ती साठी portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

**सहाय्यक आयुक्त, आर/दक्षिण**

# <u>अटी व शर्ती</u>

1. **दि.**01.01.2018 **ते** दि.04.06.2018 **या** कालावधीतील चारचाकी 15, **तीनचाकी** 28 **आणि** दोनचाकी 89 **वाहनांचा** लॉट तयार करून एकत्रितरित्या लिलाव करण्यात येईल.

2. **वाहनांचा** लिलाव मुल्यांकन समिती मार्फत दि.23.03.2020**रोजी** सकाळी 11.30 **वाजता** करण्यात येईल.

3. **निरीक्षण** दिनांक 16.03.2020 **ते** 18.03.2020 **रोजी** सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त असेल.

4. **इसारा** ठेव रक्कम जमा करणे दिनांक 19.03.2020 **ते** 20.03.2020**असा** असेल.

5. **दि.**01.01.2018 **ते** दि. 04.06.2018 या कालावधीतील चार चाकी, तीन चाकी, दोन चाकी, वाहनाचा लिलाव एकत्रितरित्या मुळ मुल्य (Base Prize) रु.5,60,000/- **ठरवून लिलाव करण्यात येईल.**

6. **वरील** सर्व लॉट मध्ये कमीत कमी रुपये 5,000/- **च्या** वाढीची (Incremental Amount) **मर्यादा** ठेवण्यात आली आहे.

7. **लिलावातील** वाहन चोरीच्या गुन्ह्यांमधील असल्यास सदर वाहन पुढील न्यायालयीन कार्यवाही करीता संबंधीत पोलीस ठाण्याच्या ताब्यात द्यावे लागेल त्यामुळे अशा प्रकारची वाहने त्याच प्रमाणे न्यायालयीन प्रकरणातील वाहने लिलावातून वगळण्यात येतील.

8. **लिलाव** घेणा-**या** ठेकेदाराने लिलावाची रक्कम तीन दिवसात भरणे अपेक्षीत आहे.

9. **कज्जे** दावे न उद्भवण्यासाठी लिलावातील वाहनांचा ताबा भंगार विक्रेत्यास नियत लिलाव दिनांक आधी देई पर्यंत जर मालकाने नियत दंड व आकार भरुन सोडविल्यास ते वाहन लिलावातून वगळण्यात येईल.

10. **लिलावातील** वाहने आहेत त्या स्थितीत अथवा महानगरपालिकेच्या वाहन प्रांगणातच तोडून भंगार विक्रेता 10 **दिवसात** घेऊन जाईल.

11. **यशस्वी** बोलीदाराने लावलेल्या बोलीवर 9% **महाराष्ट्र** शासन जीएसटी व 9% **केंद्र** शासन जीएसटी असा एकुण 18% **जीएसटी** आणि टी.सी.एस 2% **आकारण्यात** येईल. **सदर यशस्वी बोलीदाराने सदर कराची रक्कम महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांना परस्पर भरून त्याची पोच पावती महानगरपालीकेस सादर करावी.**

12. **इसारा** ठेव रक्कम - **लिलाव** घेणा-**या** ठेकेदारानी लिलावाची एकुण अंदाजित अपेक्षित रुपये 5,60,000/- **लिलाव** किमतीच्या **5% रुपये** 28,000/- **इसारा** ठेव रक्कम दिलेल्या दिवसात म्हणजेच दिनांक 19.03.2020 **ते** 20.03.2020 **पर्यंत** डीमांड ड्राफ्ट जमा करणे आवश्यक असेल. **यशस्वी बोलीदाराचा** इसारा ठेव रक्कम (EMD) **डीमांड** ड्राफ्ट जमा करून उर्वरीत अयशस्वी बोलीदारांचा इसारा ठेव रक्कम (EMD) **डीमांड** ड्राफ्ट लिलावानांतर परत केला जाईल.

13. **भंगार** वाहनांच्या देयकाचे अधिदान प्रत्यक्ष स्थळी सर्व करांसहीत डीमांड ड्राफ्ट भरल्यानंतरच ठेकेदार भंगार माल उचलू शकेल.

14. **जर** ठेकेदाराने ठरविल्यादिवशी किंवा वेळेत भंगार माल उचलला नाही तर इतर अटींना बाधा न आणता प्रत्येक दिवसासाठी रुपये 5,000/- **चा** दंड आकारण्यात येईल.

15. **ठेकेदाराने** भंगार मालाची रक्कम महापालिकेत भरल्यानंतर विहीत कालावधीच्या ( **साप्ताहीक** सुट्टी व सार्वजनिक सुट्टी वगळून ) **ठेकेदार** भंगार माल उचलू शकेले नाहीत तर न उचलल्या गेलेल्या भंगार मालावर भंगार माल उचलण्याच्या देय दिनांकापासून विक्रीच्या किमंतीवर 2% **दराने** प्रतिदिनी डॅमरेज चार्जेस / **दंड** ठेकेदाराकडून वसुल करण्यात येईल.**तसेच** ठेकेदाराने भंगारमाल उचलण्यासाठी मनपाकडे भरणा केलेली रक्कम कोणतीही पुढील सुचना न देता महापालिका जप्त करु शकेल आणि शिलक्क भंगार माल महापालिका योग्य रितीने पुर्न:**विक्री** करेल.

16. **वाहनातील** चेसी क्रमांक व इंजिन क्रमांक इतर वाहनात पुर्नवापरात येऊ नये याकरिता यशस्वी बोलीदाराने लिलावातील वाहने उचलण्यापूर्वी पुन्हा वापर होणार नाही असे हमीपत्र विहित नमुन्यात, योग्य ते मुद्रांक शुल्क भरून महानगरपालिकेस सादर करावे.

17. **लिलावा** बाबत किंवा लिलावातील वाहने भंगार विक्रीत्याच्या ताब्यात देई पर्यँत काही अडचणी उद्भवल्यास त्याबाबत सहाय्यक आयुक्त आर-**दक्षिण** यांनी निर्णय घेणे अपेक्षित आहे.

**सहाय्यक आयुक्त, आर /दक्षिण**